जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.२४/०२/२०२४**
**दि.२३/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे ८०/२०२४,भादविक ३०७,३२४,३२३,५०६,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७ आर्म ॲक्ट कलम ४(२५),मपोअधि कलम ३७(१)(३)सह १३५ व क्रिमीनल लॉ अमेंडमेंन्ट ॲक्ट कलम ७ |
| **फिर्यादी** | सागर कांबळे वय ३२ वर्षे रा.रामनगर,वारजे माळवाडी,पुणे. |
| **आरोपीत** | सहा ते सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०२/२०२४ रोजी रात्रौ. ००/२० वा.चे.सुमा.अचानक चौक जवळील पार्किंगमध्ये, रामनगर वारजे माळवाडी, पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा मित्र नमुद ठिकाणी गप्पा मारत असताना नमुद इसम सदर ठिकाणी येवुन फिर्यादीस म्हणाले की,अरबाज शेख व निल नाईक याची भांडणे का सोडवली त्याचे कारणांवरून राग मनात धरून त्यांनी फिर्यादीवर जीवघेणा हल्ला करून.फिर्यादीच्या घराचा बाथरुमचा दरवाजा तोडून नुकसान करून सदर ठिकाणी दहशत निर्माण केली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.सचीन पाटील मो.नं.९००४४६५९१८ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ८०/२०२४,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | अक्षय धुमाळ, पोलीस अंमलदार,मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर. |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०२/२०२४ रोजी १६/३० वा.चे सुमा.शिर्केकंपनी गेट नं.२ समोर,स्काय वन बिल्डींग, भिमनगर,मुंढवा, पुणे येथे घडला असे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादीची फिर्याद की, वर नमुद ठिकाणी ६ व्या मजल्यावरील सेंट्रींगचे साहित्य क्रेनच्या सहाय्याने खाली घेण्याचे काम चालू असताना सेंट्रींग काम करणारा कामगार रणधीर सियासरण मेहता वय २६ वर्षे, सध्या रा.सदर मुळगांव वॉर्ड नं. ६, कचरा, ता. सोरबजार, जि. सहरसा, राज्य-बिहार हा जिन्या समोरील लिफ्टचे बाजूला असलेल्या डक्ट मधून खाली पडल्याने त्यास गंभीर दुखापत होऊन तो मयत झाला आहे. त्यावेळी नमुद इसम यांना संपूर्ण जाणीव असताना देखील त्यांनी कामगारांना संरक्षण साहीत्य न देता त्यात त्यांनी हयगय व निष्काळजीपणाचे कृत्य केल्याने ६ व्या मजल्यावर काम करीत असलेला कामगार हा खाली पडुन त्याचा मृत्यु होण्यास ते कारणीभुत झाले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अनिल बिनवडे मो.नं ९१५८८८८१०० |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे माळवाडी पो स्टे ७९/२०२४,भादविक ३२६,१४३,१४७,१४९,३३६,३२३,५०४,५०६,४२७, आर्म ॲक्ट कलम ४(२५), सह क्रिमीनल अमेंडमेंन्ट लॉ ॲक्ट कलम ७,मपोअधि कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे |
| **फिर्यादी** | आकाश दिवेकर, वय २८ वर्षे, रा.रामनगर, वारजे माळवाडी, पुणे |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | सहा ते सात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०२/२०२४ रोजी रात्रौ.२३/०० वा.चे सुमा.शिवरत्न प्रतिष्ठान चौक,डोंगरवाडी,रामनगर, वारजे माळवाडी, पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी घरी झोपलेले असताना घराचे बाहेर दगड पडल्याचा आवाज आलेने घरातुन बाहेर आले त्यावेळी फिर्यादीचा मित्र नामे बाबु चव्हाण यांस अचानक चौकातील अमरजीत मुन्नासिंग व रोहन चव्हाण असे बाबु चव्हाण त्याची गचंडी पकडून त्याला निलू सोलापूरे याला का मारहाण केली असे विचारत हाताने मारहाण करीत होते ती भांडणे सोडविण्यासाठी फिर्यादी व त्यांची आई भाऊ व बाबू चव्हाणची आई असे गेले असता निल्लू सोलापूरे, योगेश करंजकर यांनी तुम्ही आमच्यामध्ये का येता असे म्हणत यांनी फिर्यादीच्या कपाळावर वीट मारून गंभीर जखमी केले. तसेच तेथे जमलेल्या लोकांना शिवीगाळ करुन, लोकांवर हत्यारे उगारून सदर ठिकाणी दहशत निर्माण केली |
| **त.अंमलदार** | महिला पो.उप.निरी.अनिता दुगावकर मो.नं.९७६५७८४४०५ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे १६४/२०२४,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ५८ वर्षे, रा.आंबेगांव बुाा पुणे |
| **आरोपीत** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०२/२०२४ रोजी दु.१३/०० वा चे सुमा.कुटुंब सोसायटी,एफ विंग,आंबेगांव बुाा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पती कुलदीप चंदरराव पिसाळ वय-५८ वर्षे, रा. कुटुंब सोसायटी , एफ विंग,आंबेगांव बुाा,पुणे यांना त्यांचे नातेवाईक यांनी फिर्यादी यांचे मूळगांवी असलेल्या शेत जमिनीच्या वादातून वारंवार त्रास देवून मारहाण केल्याने व त्यांचे वारंवार होणा-या त्रासाला कंटाळून फिर्यादी यांचे पतींनी नमुद ठिकाणी पाचव्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.शेंडे मो.नं.९५२७३५६२९० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ५६/२०२४,भादविक १६०,४२७ |
| **फिर्यादी** | अनंत भोसले सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी,प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे रा.येरवडा, पुणे |
| **आरोपीत** | १५ ते २० इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०२/२०२४ रोजी सायं.१७/०० वा.चे सुमा.प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे येथील सहायक मोटारवाहन निरीक्षक कक्षाचे समोर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी नमुद ठिकाणी एकमेकांशी झोंबाझोंबी करुन धक्काबुक्की करत मोठमोठयाने आरडाओरडा करुन सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेचा भंग करून नमुद कार्यालयातील टेबल व पार्टीशनच्या काचेला धक्का लागून नुकसान केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.जाधव मो.नं.८२७५८४०३३१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**